साप्ताहिक
शहापूर वैभव
मुख्य संपादक - रविंद्र लकडे
RNI NO. MAHMAR/2012/43007
● मंगळवार दि. १४/०४/२०२० ● अंक - १५ वा ● किंमत - २ रु ● पाने - ८




# शहापूरकरांनो सावधान!
# कोरोना
# शहापूरात आयात होतोय

## प्रशासनाचा अविवेकतालुक्याच्या अंगलट येण्याची शक्यता




कोरोनाचा थैमान आता खऱ्या अर्थाने सुरू झालाय आणि महाराष्ट्रात तो सर्वाधीक आहे. मुंबई पाठोपाठ ठाणे, मिराभाईंदर, नविमुंबई, कल्याण डोंबिवली, बदलापुर अंबरनाथ, पालघर, वसई विरार कोरोनाच्या विलख्यात अडकले असुन भिवंडीतही शिरकाव झाला आहे. शासनाने याकरीता लॉकडाऊन हा अंतिम आणि एकमेव उपाय योजीला आहे. या लॉकडाऊनचा शहापूरात काही अंशी फज्जा उडाला होता. मात्र ४ दिवसापांसुन जिल्हाधीकाऱ्यांच्या आदेशानुसार शहापूरची पूर्ण नाकाबंदी करण्यास प्रशासनाला यश आलेले आहे. तथापी याचा मोठा फटका फाजीपाला उत्पादक, शेतकरी, दुध विक्रेते, मजुर, कंत्राटदार किरकोल व्यापारी यांना देखील बसला आहे. सुदैवाने शहापूरमध्ये अजुन एकही रूग्ण आढळला नाही. तालुक्यात कोरोना आला नसल्याने जरी धोका कमी असला तरी प्रशासनाने मात्र कमालीची कडक उपाययोजना केली आहे. मात्र जेथुन धोका दाट आहे त्यावर प्रशासनाने कोणतीच भुमीका घेतलेली दिसत नाही उलटपक्षी कोरोना शहापूरात आयात करण्याचा हा मार्ग बिनदिक्कत सुरू आहे. कोरोना येण्याचा संभाव्य धोका म्हणजे बाहेरून येणारा कर्मचारी वर्ग, शहापूर तालुक्यातील मोठ्या प्रमाणातील हा कर्मचारी वर्ग, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार महानगरपालीका क्षेत्रात कामासाठी जातो.

विशेष म्हणजे या कर्मचाऱ्यांना एका बसमध्ये कोंबुन नेत असल्याने सुरक्षीत अंतराच्या संकल्पनेला शासनानेच मुठमाती दिली आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये डॉक्टर, नर्स, सफाई कामागार, वार्डबॉय, स्मशासनभुमीत काम करणारे कर्मचारी देखील आहेत. कोरोना रूग्नांच्या सानिध्यात असणाऱ्या या कर्मचाऱ्यांना अधिक भिती आहे. त्यामुळे संवेदनशील काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांची महापालीका प्रशासनाने त्याच क्षेत्रात राहण्याची व्यवस्था करणे गरेजेचे होते. परंतु या



कर्मचाऱ्यांना त्यांच्या गावी येण्याची मुक्तता असल्याने या कर्मचाऱ्यांसोबत त्यांच्या परिवाराचाही जीव धोक्यात आहे. शिवाय गावामध्ये वावर हा मुक्त पणाने असल्याने गावात यांचा जबदस्त फैलाव होऊ शकतो. शहापूरच्या प्रशासनाने देखील याचा विचार करून या कर्मचाऱ्यांचा राहण्यासाठी स्वतंत्र बेसकॅम्प करणे गरजेचे होते मात्र हे सर्व कर्मचारी शहापूरहुन आपल्या गावात, घरात खुले आम ये-जा करत आहेत. नदिसणारा हा शत्रु बेसावध क्षणी कोणत्याही कर्मचाऱ्याला गाठू शकतो आणि दुर्दैवाने अशा प्रकारे लागण झालेला कर्मचारी ठिणगीच्या रूपाने कोरोनाचा वणवा तालुक्यामध्ये भडकवु शकतो ही बाब अजुनही प्रशासनाने लक्षात घेतलेली नाही.

शहापूरच्या तहसीलदार याकडे अजुनही गंभीरपणे पाहत नाहीत ही शोकांतीका आहे. मात्र तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर तरूलता धानके यांनी अशा कर्मचाऱ्यांचा लेखी पत्रक काढून आढावा घ्यायची सुरूवात केली आहे. त्यांची ही तत्परता निश्चीतच कौतुकास्पद आहे. तरी सुध्दा जिथे धोका नाही तीथे कडक मज्जाव करणारे तहसील आणि पोलीस प्रशासन कोरोनाचा संभाव्य धोका ओळखुन वेळीच उपाययोजना करेल तर आणि तरच शहापूर कोरोना मुक्त राहील. सुरक्षीत राहील. अन्यथा साप सोडून फरफट कुटण्याचा हा प्रकार आहे.


